A-1

# श्री. यमाई देवी ट्रस्ट, कनेरसर रजि.क्र. ए. १२६६/पुणे.

## भाविकांकरिता सुचना

**श्री. यमाई देवी मंदिर, कनेरसर, तालुका खेड चा सार्वजनिक नवरात्रोत्सव वर्ष–2022**

दिनांक 29/08/2022 रोजी श्री. यमाई देवी ट्रस्ट, कनेरसर च्या प्रशासक समितीची बैठक पार पडली. सदरील बैठकीमध्ये येणा–या दिनांक 26/09/2022 ते 05/10/2022 या कालावधीतील नवरात्र व दसरा सणाचे नियोजन झाले. **उपस्थित सदस्यांमध्ये सर्वानुमते असे ठरले की, यंदाचा नवरात्र उत्सव हा पारंपारिक पध्दतीने नेहमीप्रमाणे साजरा करण्यात येईल**.

प्रशासक समितीच्या सभेत पुढे असेही ठरले की, देवीची पारंपारीक पुजा, आरती, नैवेद्य तसेच घटस्थापना इत्यादी विधी पारंपारिक पध्दतीने पुजारी/गुरव/परडीवाले व ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत पार पाडण्यात येतील. कनेरसर गावच्या विद्यमान सरपंच सौ. सुनिता केदारी हया, ग्रामस्थ व प्रशासक समिती यांच्यामध्ये समन्वय ठेवणे, स्थानिक पातळीवर नवरात्र उत्सवाचे नियोजन करणे, स्थानिक लोकप्रतिनिधी यांना आमंत्रित करणे, त्यांचे यथोचित सत्कार करणे, इत्यादी कामे करतील.

तसेच देवस्थान प्रशासक समिती तर्फे सर्व किरकोळ/मोठे व्यापारी व दुकानदार, ग्रामस्थ, गुरव, पुजारी, परडीवाले व भाविकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी मंदिर परिसरात आपल्याला नेमुन दिलेल्या ठिकाणी आपला फुल व इतर साहित्य विक्रीचा व्यवसाय करावा. भक्तांना गैरसोय होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच प्रशासक समिती तर्फे वाहन पार्किंग व इतर योग्य ती व्यवस्था करण्याचे प्रायोजित आहे. **नियमित गाळे धारक वगळता इतरांना देवस्थानच्या जागेत प्रशासक समितीच्या परवानगीशिवाय व विहीत शुल्क भरल्याशिवाय स्टॉल लावण्याची किंवा व्यवसाय करण्याची परवानगी असणार नाही याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.**

तसेच देवस्थान प्रशासक समिती तर्फे सर्व भाविकांना आवाहन करण्यात येते की, त्यांनी ऑनलाईन देणगीसाठी देवस्थानच्या

www.yamaidevi.com या संकेत स्थळाला भेट देवून सदरील संकेतस्थळावर नमुद देवस्थानचा बॅंक खात्याचा तपशिलाचा वापर करावा. भाविकांना असेही आवाहन करण्यात येते की, त्यांनी मंदिर परिसरात देणगी देतांना देवस्थान प्रशासक समितीने अधिकृत केलेल्या व ओळखपत्र असलेल्या व्यक्तीलाच देणगी द्यावी व त्यांच्याकडुन पावती घ्यावी.

या ठिकाणी सर्व भाविक भक्तांना असेही सुचित करण्यात येते की, देवस्थान प्रशासक समिती तर्फे कुठल्याही इसमाला किंवा संस्थेला भाविकांच्या घरी जावुन किंवा आस्थापणांना भेटी देवुन देणगी मागण्याचे अधिकार देण्यात आले नाहीत. श्री. यमाई देवस्थान, कनेरसर हे फक्त ऑनलाईन देणगी व प्रत्यक्ष मंदिर परिसरात पावतीव्दारे देणगी स्वीकृत करते याची भाविकांनी नोंद घ्यावी.

यावर्षी नवरात्र कालावधी करिता देवस्थान तर्फे **अन्नदान पावती** भाविकांच्या आग्रहास्तव चालु करण्यात आली आहे. अन्नदानासाठी फक्त नवरात्र कालावधी पुरतेच देणगी स्वीकारण्यात येईल याची भाविकांनी नोंद घ्यावी.

तरी देवस्थान प्रशासक समिती तर्फे सर्व भावीकांना, ग्रामस्थांना, व्यापा–यांना व इतर सर्व संबंधीतांना विनंती करण्यात येते की, त्यांनी या वर्षीच्या नवरात्र व दसरा सणाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रशासक समितीला सहकार्य करावे.

दिनांक :– 05/09/2022

सही/–

प्रशासक समिती श्री. येमाई देवस्थान
ट्रस्ट, कनेरसर.